महासंचालक (न्यायिक व तांत्रिक), महाराष्ट्र राज्य,मुंबई यांच्या अधिनस्त असलेल्या न्यायसहायक वैज्ञानिक प्रयोगशाळा संचालनालयाच्या आस्थापनेवरील डॉ.कृ.वि. कुलकर्णी,उपसंचालक यांना सह संचालक, गट-अ या पदावर तदर्थ पदोन्नती देण्याबाबत.

महाराष्ट्र शासन
गृह विभाग
शासन आदेश क्रमांक एफएसएल-०४१७ /प्र.क्र.१२०/पोल-४
मंत्रालय, मुंबई - ४०० ०३२,
दिनांक :-४ एप्रिल, २०१८.

संदर्भ :- १) महासंचालक (न्यायिक व तांत्रिक),महाराष्ट्र राज्य,मुंबई यांचे क्रमांक महासंचालक /गो / ०१/२०१७,दि.२८.२.२०१७ चे पत्र.
२) सामान्य प्रशासन विभाग, मंत्रालय, मुंबई यांचे पत्र क्रमांक ईएसबी -१११७/प्र.क्र.११५५/१३, दि.५.३.२०१८ चे पत्र.
३) शासन परिपत्रक,सामान्य प्रशासन विभाग क्र.सीडीआर-१०८२/२५६७/२८/११, दिनांक ३०.०८.१९८२

शासन आदेश :-

महासंचालक (न्यायिक व तांत्रिक),महाराष्ट्र राज्य,मुंबई यांच्या अधिनस्त न्यायसहायक वैज्ञानिक प्रयोगशाळा संचालनालय यांच्या आस्थापनेवरील डॉ.कृ.वि. कुलकर्णी, उपसंचालक,गट-अ (पे बॅन्ड रु.१५६००-३९१००+ग्रेड पे- रु.६९००) यांना सह संचालक, गट-अ (**पे बॅन्ड रु.३७४००-६७०००+ग्रेड पे - रु.८७००)** या वेतनश्रेणीतील पदावर या आदेशाच्या दिनांकापासून खालील अटींच्या अधीन राहून तात्पुरत्या स्वरूपात पदोन्नतीने नियुक्ती करण्यात येत आहे.

२. सदर पदोन्नती ही मा.सर्वोच्च न्यायालयात प्रलंबित असलेल्या विशेष अनुमती याचिका क्र.२८३०६/२०१७ मधील अंतिम निर्णयाच्या अधीन राहून तात्पुरती पदोन्नती देण्यात येत आहे.

३. सदर पदोन्नती तात्पुरत्या स्वरुपाची असून महाराष्ट्र लोकसेवा आयोगाच्या मान्यतेच्या अधिन राहून देण्यात येत आहे.

४. सदर पदोन्नती उपरोक्त नमूद अधिका-याविरूध्द विभागीय चौकशी प्रलंबित अथवा प्रस्तावित नाही, या धारणेच्या अधिन राहून देण्यात येत आहे.

५. सदर पदोन्नती शासकीय अधिकारी/कर्मचारी यांना वयाच्या ५०/५५ वर्षापलीकडे सेवेत ठेवण्याबाबतच्या शासनाच्या तत्संबंधीच्या आदेशाच्या अधीन राहील.

६. पदोन्नत झालेल्या अधिका-याने त्यांच्या पदोन्नतीचे आदेश प्राप्त झाल्याच्या दिनांकापासून सात दिवसांच्या आत पदोन्नतीच्या ठिकाणी हजर होणे आवश्यक आहे व त्यांनी अनधिकृतरित्या रजेवर जाऊ नये, यासंदर्भात त्यांचे लक्ष सामान्य प्रशासन विभाग परिपत्रक क्र.सीडीआर-१०८२/२५६७/२८/११, दिनांक ३०.०८.१९८२ अन्वये दिलेल्या सूचनांकडे वेधण्यात येत आहे.

७. सदर प्रकरणी महासंचालक(न्यायिक व तांत्रिक),महाराष्ट्र राज्य,मुंबई यांनी पुढील योग्य ती कार्यवाही करावी व त्याबाबतचा अहवाल शासनास सादर करावा.

८. सदर शासन निर्णय सामान्य प्रशासन विभागाच्या दि.५.३.२०१८ रोजीच्या पत्रान्वये, आस्थापना मंडळ क्र.२ ने दिनांक २१.२.२०१८ रोजीच्या बैठकीत घेतलेल्या निर्णयाच्या अनुषंगाने निर्गमित करण्यात येत आहे.

सदर शासन आदेश महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आले असून त्याचा संकेताक २०१८०४०५११३८२८५३२९ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नांवाने,

Sunil J Sovitkar

Digitally signed by Sunil J Sovitkar
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=Home Department, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=3d8ee31cf28155a3c297f1c4b60ba7aa7197b86c24ce4eb660c798a1afe6f9cc, cn=Sunil J Sovitkar
Date: 2018.04.05 11:39:13 +05'30'

(सु.ज.सोवितकर)
सह सचिव, गृह विभाग, महाराष्ट्र शासन

प्रति,

१. मा.मुख्यमंत्री यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई,
२. मा.राज्यमंत्री,गृह (शहरे) यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई,
३. मा.राज्यमंत्री,गृह (ग्रामिण) यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई,
४. अपर मुख्य सचिव (गृह) यांचे वरिष्ठ स्वीय सहायक, मंत्रालय, मुंबई,
५. महासंचालक (न्यायिक व तांत्रिक),महाराष्ट्र राज्य,मुंबई-३२,
६. प्रधान सचिव (विशेष) यांचे वरिष्ठ स्वीय सहायक,गृह विभाग,मंत्रालय,मुंबई-३२,
७. सचिव,महाराष्ट्र लोकसेवा आयोग,एमटीएनएल इमारत,कुपरेज,मुंबई (पत्राने),
८. संचालक, न्यायसहायक वैज्ञानिक प्रयोगशाळा संचालनालय, महाराष्ट्र राज्य, मुंबई,
९. महालेखापाल (लेखा व अनुज्ञेयता/लेखा परीक्षा) महाराष्ट्र-१, मुंबई,
१०. अधिदान व लेखा अधिकारी, मुंबई,
११. निवासी लेखा अधिकारी, मुंबई,
१२. सामान्य प्रशासन विभाग (कार्यासन-१३), मंत्रालय, मुंबई,
१३. डॉ.कृ.वि.कुलकर्णी, प्रभारी संचालक, न्यायसहायक वैज्ञानिक प्रयोगशाळा संचालनालय, महाराष्ट्र राज्य, मुंबई,
१४. सर्व उपसंचालक, प्रादेशिक न्यायसहायक वैज्ञानिक प्रयोगशाळा,महाराष्ट्र राज्य,
१५. सर्व उपसंचालक, न्यायसहायक वैज्ञानिक प्रयोगशाळा संचालनालय, महाराष्ट्र राज्य, मुंबई,
१६. निवडनस्ती/गृह विभाग (पोल-४)